ईश्वर टी ॲण्ड नाष्टा सेंटर
संपुर्ण महाराष्ट्रातील खवैयांची आवडती चव
सावेडी उपनगरातील प्रेमदानचौकात
पोहे, समोसा, शाबुदाणा खिचडी
प्रो.प्रा. ईश्वर जायभाय- 70583 88547
प्रेमदानचौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर

मनोरंजनासह प्रबोधनासाठी... दैनिक epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

पेस्ट कंट्रोल
झुरळ, डास, मुंग्या, कोळी , पाल, गोम, गोचीड, पिसवा, उंदीर, घुस, लाईटचे किडे, वाळवी, ढेकुन इ.
या सारख्या किटकांपासुन मुक्तता.
औषधाचा वास नाही, रंग नाही, साइड इफेक्ट नाही.
शिवाय घरात जास्त आवरा आवर नाही.
अपेक्स बायोटेक पेस्ट कंट्रोल
जेऊर (बा.), अहिल्यानगर.
संदीप पवार - 98 23 75 17 76

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ३३० वा ● शनिवार, ता. १४ जून २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००

## ऊर्जा क्षेत्रात हरितक्रांतीचे दिशानिर्देश- मुख्यमंत्री

### फडणवीस यांचा ऊर्जा विभागास स्पष्ट संदेश



**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याच्या ऊर्जा क्षेत्राचा व्यापक आढावा घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ऊर्जा विभागाला पायाभूत सुविधा बळकट करण्यासाठी कालबद्ध नियोजन करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस यांनी हरित ऊर्जेच्या दिशेने अधिक सक्षम आणि गतिमान पावले उचलण्यावर भर दिला. बैठकीला अपारंपरिक ऊर्जा मंत्री अतुल सावे (दूरदृश्यप्रणालीद्वारे), राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर तसेच ऊर्जा विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट निर्देश दिले की, ''मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०'' हा ऊर्जा क्षेत्रातील गेम चेंजर प्रकल्प डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करणे अनिवार्य आहे. तसेच 'पीएम सूर्यघर : मोफत वीज योजना' अंतर्गत राज्यातील सर्व शासकीय इमारतींचे सौर ऊर्जेव्दारे विद्युतीकरण करण्यासाठी महाऊर्जाने योजनेतील सर्वेक्षण लवकरात लवकर पूर्ण करून कार्यवाहीस गती द्यावी. मॉडेल सोलर व्हिलेज संकल्पनेसाठी महावितरण आणि महाऊर्जा यांनी संयुक्तपणे समन्वय साधून काम करावे, असेही त्यांनी सूचित केले. राज्यातील निर्माण, पारेषण आणि वितरण या तीनही पातळ्यांवरील सर्व प्रकल्प 'गती शक्ती' योजनेच्या धर्तीवर नियोजित वेळेत पूर्ण होणे अत्यावश्यक असल्याचे मुख्यमंत्र्यांनी अधोरेखित केले. वीज गळती रोखण्यासाठी केंद्र शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी आणि नागरिकांमध्ये वीज बचतीविषयी जनजागृती करावी, असेही त्यांनी शेवटी बजावले. हरित ऊर्जा, आधुनिक वीज वितरण आणि शाश्वत विकासाच्या दिशेने महाराष्ट्र सरकारने आता निर्णायक पावले उचलायला सुरुवात केली आहे.

## मूर्तिकार पद्मभूषण राम सुतार साकारत आहेत डॉ. आंबेडकरांचा भव्य पुतळा

### विधानसभा उपाध्यक्ष बनसोडे यांनी केली पाहणी



**गाझियाबाद । प्रतिनिधी**

सामाजिक न्याय आणि संविधानाच्या मूल्यांचे प्रतीक असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य पुतळ्याच्या निर्मितीचे काम सध्या गाझियाबाद येथील वर्कशॉपमध्ये जोमात सुरू आहे.

सुप्रसिद्ध मूर्तिकार पद्मभूषण राम सुतार यांच्या मार्गदर्शनाखाली हे काम साकारले जात आहे. नुकतीच या कामाची पाहणी महाराष्ट्र विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी केली. पुतळ्याच्या मूळ रचनेपासून ते प्रत्येक तपशिलापर्यंतची माहिती घेत त्यांनी समाधान व्यक्त केले.

''हा पुतळा केवळ एक शिल्प नसून, सामाजिक न्यायाच्या विचारांना चालना देणारा प्रेरणास्थान ठरेल,'' असे मत त्यांनी व्यक्त केले.

उपाध्यक्ष बनसोडे यांच्या या भेटीमुळे पुतळ्याच्या कामास नवे बळ मिळाले असून, राज्यभरातून या प्रकल्पाकडे लक्ष लागले आहे. राम सुतार यांच्यासारख्या अनुभवी आणि जागतिक ख्यातीच्या मूर्तिकाराच्या हस्ते साकारला जाणारा हा पुतळा भविष्यात एक ऐतिहासिक स्मारक ठरणार आहे.



## साहित्यसम्राट आचार्य अत्रे यांना अभिवादन

### वरळी नाका येथे ५६ वा पुण्यस्मरण दिन साजरा

**मुंबई । गुरूदत्त वाकदेकर**

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील अग्रणी आणि साहित्य, नाट्य, पत्रकारिता, राजकारण अशा विविध क्षेत्रांत भरीव योगदान देणारे साहित्य सम्राट आचार्य अत्रे यांच्या ५६व्या पुण्यस्मरणदिनी त्यांच्या स्मृतीला उजाळा देण्यात आला. मुंबईतील वरळी नाका येथील आचार्य अत्रे चौकात अत्रे यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमात कुटुंब रंगलय काव्यात चे विसुभाऊ बापट, मराठी वृत्तपत्र लेखक संघाचे अध्यक्ष रवींद्र मालुसरे आणि साहित्यिक शरद बर्डे यांनी अत्रे यांच्या कार्याची आठवण करून दिली. ''अत्रे हे महाराष्ट्राचे सर्वव्यापी आणि बलदंड व्यक्तिमत्त्व होते,'' अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. अत्रे यांनी केवळ लेखणीच्या माध्यमातून नव्हे, तर आपल्या भाषणांनीही संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याला दिशा दिली. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्रासाठीचा ठराव मुंबई महापालिकेत मांडणारे पहिले व्यक्तिमत्त्व अत्रेच होते.फविशेषत: निरक्षर कवयित्री बहिणाबाईंच्या कवितांना लोकमान्य करण्याचे महत्त्वाचे कामही अत्रे यांनी केले. त्यांच्या लेखणीने मराठी मनात महाराष्ट्रासाठी जिवंत भावना चेतवली. आजची मुंबई पाहता, मराठी माणसांचा पुढेही या शहरावर अधिकार राहील का, याचे आत्मपरीक्षण करण्याची गरज असल्याचेही मत यावेळी मांडण्यात आले. या स्मृतिदिनाचे औचित्य साधून ''आचार्य अत्रे समिती, महाराष्ट्र राज्य'' या नावाने नवीन संस्थेची स्थापना केली जात असल्याची घोषणा आरती सदावर्ते-पुरंदरे यांनी केली. यापुढे अत्रे यांना अभिप्रेत उपक्रम राबवले जातील, असे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाला ज्येष्ठ निवेदिका मधू मंजिरी गटणे, श्रीकांत मयेकर आणि श्रीमती सविता झेंडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते

## शनिशिंगणापूर देवस्थानने १६७ कर्मचाऱ्यांना केले कामावरून कमी

### गैरहजेरी व हलगर्जीपणाचे दिले कारण

**सोनई प्रतिनिधी**

शनिशिंगणापूर देवस्थानने एक मोठा निर्णय घेत १६७ कर्मचाऱ्यांना कामावरून कमी केले आहे. २०१५ साली टप्प्याटप्प्याने भरती करण्यात आलेल्या या कर्मचाऱ्यांविरोधात विविध आरोप होते, ज्यात सततची गैरहजेरी, हलगर्जीपणा आणि कर्तव्यात कसुर या प्रमुख बाबी होत्या. देवस्थान विश्वस्त मंडळाच्या ८ जून २०२५ रोजी झालेल्या बैठकीत ९९ कर्मचाऱ्यांना कामावरून कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. यानुसार त्यांना ११ जून रोजी रजिस्टर्ड पोस्टाने नोटीसाही पाठवण्यात आली. यानंतर १३ जून २०२५ रोजी पुन्हा झालेल्या बैठकीत आणखी ६८ कर्मचाऱ्यांविरोधातही अशीच कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला. या कर्मचाऱ्यांना सुद्धा आज-उद्या नोटीस पाठवण्यात येणार असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी जी.के. दरदले यांनी दिली. या संपूर्ण कारवाईबाबत देवस्थानचे अध्यक्ष भागवत बानकर यांनी सांगितले की, कामात कसूर, सततची अनुपस्थिती यामुळेच ही कठोर पावले उचलण्यात आली आहेत. सार्वजनिक निधीतून वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून जबाबदारी अपेक्षित असते. काही राजकीय हिंदू संघटनांनी कर्मचाऱ्यांच्या भरती प्रक्रियेवर आक्षेप घेतला होता. याच पार्श्वभूमीवर समाजाच्या वतीने मोठा महामोर्चा काढण्याचाही इशारा देण्यात आला होता. देवस्थानच्या या निर्णयामुळे गावात आणि परिसरात चांगलीच चर्चा सुरू झाली असून, पुढे यावर काय प्रतिक्रिया उमटतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, भारतीय राज्यघटनेने दिलेल्या कायदेशिर हक्कानुसार



कोणत्याही व्यक्तीस जात, धर्म अथवा लिंगाच्या भेदभावाच्या आधारावर उदरनिर्वाहापासून वंचित करता येणार नाही, रोजगार हिरावून घेता येणार नाही. मानवीहक्कांवर देवस्थानला गदा आणता येणार नाही. देवस्थानमधे गेल्या काही दिवसांपासून अनेक प्रकारचे आर्थिक घोटाळे उघड होत असल्याच्या चर्चा परिसरात होत आहेत. बनावट ॲप घोटाळा, लेखा परिक्षकाने काढलेली अंदाजे ४८ कोटींची अनियमितता, बनावट पावत्या घोटाळा तर काही कोटींची संपूर्ण एक इमारतच गायब असल्याची चर्चा स्थानिकांमधे सुरू असून या सर्वांकडे दूर्लक्ष होण्यासाठी परधर्मिय कर्मचारी यांना टार्गेट करून मूळ आर्थिक घोटाळ्यांकडे समाजाचे दूर्लक्ष होण्यासाठी हा प्रयत्न दिसत आहे.


## बच्चू कडू यांचे उपोषण प्रसिद्धीसाठी म्हणणं म्हणजे शेतकरी चळवळीचा अपमान

### राजू शेट्टी यांचा विखे पाटलांवर घणाघात



**कोल्हापूर । प्रतिनिधी**

राज्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी आमदार बच्चू कडू यांनी सुरू केलेल्या उपोषणावर जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी टीका करताना ''हे उपोषण प्रसिद्धीसाठी आहे,'' असे वक्तव्य केले होते. यावर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. राजू शेट्टी म्हणाले, जर बच्चू कडू यांचे उपोषण प्रसिद्धीसाठी असेल, तर मग सुजय विखे-पाटील यांनाही लोकसभेतील पराभवाच्या पार्श्वभूमीवर उद्यापासून संपूर्ण कर्जमुक्तीसाठी आमरण उपोषणास बसवायला हवे. महाराष्ट्रातील शेतकरी त्यांच्या पाठीशी उभा राहील. शेट्टी यांनी जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वक्तव्यावर टीका करताना म्हटले की, शेतकरी आंदोलनाला गालबोट लावण्याचा प्रयत्न देवेंद्र फडणवीस यांच्या तोंडातील शब्द विखे पाटील बोलत आहेत. ही भूमिका अत्यंत निषेधार्ह असून, सरकारने शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित करण्याऐवजी आंदोलनांची थट्टा करणे बंद करावे. विधानसभा निवडणुकीत पराभव झाल्याच्या पार्श्वभूमीवर बच्चू कडू यांनी सुरू केलेले उपोषण मागील काही दिवसांपासून चर्चेचा विषय ठरले आहे. मात्र त्यांच्या आंदोलनाच्या हेतूवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत विखे पाटील यांनी ''त्यांना पराभवाचे शल्य आहे'' असे वक्तव्य केल्याने राजकीय वातावरण आणखी तापले. राजू शेट्टींच्या या प्रतिक्रिया केवळ विखे पाटीलांवर नाही, तर संपूर्ण सत्ताधाऱ्यांवरच एक स्पष्ट इशारा मानली जात आहे. शेतकरी संघटनांच्या भावना आणि राग या प्रतिक्रियेतून उघड झाला आहे. शेतकऱ्यांच्या मुद्द्यांवरून पुढे कोणती राजकीय उलथापालथ होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.




## एकल महिलांच्या मुलांसाठी शैक्षणिक पालकत्वाचे हेरंब कुलकर्णी यांचे आवाहन

**अकोले । प्रतिनिधी**

राज्यातील विधवा, घटस्फोटीत, परित्यक्ता अशा हजारो एकल महिलांच्या मुलांसाठी शैक्षणिक मदतीचे आवाहन करण्यात आले आहे. साऊ एकल महिला समितीतर्फे राज्यातील २० जिल्ह्यांतील ८० तालुक्यांत १० हजारांहून अधिक महिलांशी सातत्याने संपर्क साधला जात आहे. त्यापैकी ४,००० शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांची माहिती गोळा करून त्यांना शैक्षणिक सहाय्य मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. राज्य निमंत्रक हेरंब कुलकर्णी यांनी सांगितले की, ''या महिला केवळ स्वत:चा उदरनिर्वाह करत नाहीत, तर आपल्या मुलांसाठीही चांगले जीवन देण्यासाठी धडपडत असतात. मात्र त्यांची सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती अत्यंत कठीण आहे.'' या पार्श्वभूमीवर समाजातील दात्यांनी पुढे येत या विद्यार्थ्यांना शैक्षणिक पालकत्व स्वीकारावे, असे आवाहन करण्यात आले आहे. शालेय विद्यार्थ्यांसाठी अपेक्षित वार्षिक खर्च पुढीलप्रमाणे नमूद करण्यात आला आहे. इ. १ ली ते ४ थी ₹२०००/-, इ. ५ वी ते १० वी ₹३०००/-, इ. ११ वी व १२ वी ₹५०००. दात्यांनी इच्छेनुसार किमान एक किंवा अधिक विद्यार्थी दत्तक घ्यावेत. मदतनिधी पाठविल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांची संपूर्ण माहिती, पावती तसेच त्यांच्या प्रगतीचा अहवाल वेळोवेळी दिला जाईल, असेही सांगण्यात आले. **अर्थसाहाय्य पाठवण्यासाठी तपशील : साऊ ट्रस्ट, बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा - अकोले, अहमदनगर, महाराष्ट्र. खाते क्रमांक : ६०४७७१२५२५९ IFSC: MAH ०००१६४१ GPay/PhonePe क्रमांक : ८२०८५८९१९५ या उपक्रमात सहभागी होण्यासाठी अधिक माहितीसाठी संपर्क : हेरंब कुलकर्णी, राज्य निमंत्रक साऊ एकल महिला समिती, अकोले, जि. अहमदनगर, फोन : ८२०८५८९१९५** एकल महिलांच्या मुलांसाठी शिक्षणाचा प्रकाश देणारी ही चळवळ, समाजातील संवेदनशील मनांना साद घालते आहे.

## पवारांच्या भेटीचा राजकीय अर्थ लावू नये- शेख

**अहमदनगर । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी नुकतीच नगर येथील उद्योजक अफजल शेख यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान खासदार डॉ. नीलेश लंके तसेच ज्येष्ठ नेते दादा कळमकर यांचीही उपस्थिती होती.



मात्र या भेटीनंतर स्थानिक राजकीय वर्तुळात शेख यांना आमदार संग्राम जगताप यांच्या विरोधात उभे करण्याचा अर्थ लावला जाऊ लागला होता. या चर्चांना पूर्णविराम देत अफजल शेख यांनी स्पष्ट केले की, ''शरद पवार साहेबांनी केवळ नवीन घराच्या निमित्ताने सदिच्छा भेट दिली होती.

या भेटीमागे कोणतेही राजकारण नाही. यावर कोणतीही चुकीची मते, चर्चा करण्यात अर्थ नाही.'' राजकीय चर्चांना फाटा देत शेख यांनी सर्वसामान्य नागरिकांना विनंती केली की, ''या भेटीचा राजकीय संदर्भ घेऊ नये. ही एक साधी सौजन्य भेट होती.'' ही प्रतिक्रिया देत शेख यांनी परिसरातील राजकीय चर्चांना ब्रेक लावण्याचा प्रयत्न केला आहे.



## ओला-उबर गोव्यात येणार नाहीत; स्थानिकांना विश्वासात घेऊनच निर्णय- मुख्यमंत्री सावंत

**पणजी । प्रतिनिधी**

गोव्यात ओला व उबर सारख्या कॅब ॲग्रिगेटर सेवा सुरू होणार असल्याच्या चर्चांवर मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी स्पष्टवक्तव्यात पूर्णविराम दिला आहे. ओला किंवा उबर गोव्यात येत नाहीत आणि येणारही नाहीत, असा स्पष्ट शब्दांत खुलासा त्यांनी केला असून या विषयावर कोणताही संभ्रम न ठेवण्याचे आवाहन केले आहे. मुख्यमंत्री सावंत म्हणाले की, ''कॅब ॲग्रिगेटर सेवेसंदर्भात मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करण्याची प्रक्रिया सुरू आहे. त्यासाठी सर्व संबंधित घटक स्थानिक टॅक्सी संघटना, व्यवसायिक आणि जनतेच्या मतांचा विचार केला जाणार आहे. कुणीही गैरसमज पसरवू नये.'' मुख्यमंत्र्यांच्या या वक्तव्यानंतर गोव्यातील टॅक्सी व्यावसायिकांमध्ये असलेली अस्वस्थता काहीशी निवळली आहे. मांद्रेचे आमदार जीत आरोलकर आणि कळंगुटचे आमदार मायकल लोबो यांनीही आज सकाळी मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन स्थानिक टॅक्सी व्यावसायिकांच्या भावना व्यक्त केल्या.



# डॉ. विखे अभियांत्रिकीच्या २६ विद्यार्थ्यांची नोकरीसाठी निवड

## कोरिझो प्रायव्हेट लिमिटेडचे स्नेहल कोतकरला सर्वोच्च पॅकेज

**अहमदनगर । विजय मते**

डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, विळद घाट (अहिल्यानगर) येथील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलेकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागातील २६ विद्यार्थ्यांची नामवंत कंपन्यांमध्ये कॅम्पस मुलाखतीद्वारे निवड झाली आहे. महाविद्यालयाच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या माध्यमातून एकूण आठ कंपन्यांनी या विभागातील अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांची निवड प्रक्रिया राबवली. या निवड प्रक्रियेत कोरिझो प्रायव्हेट लिमिटेड (पुणे), सिरमा एसजीएस टेक्नॉलॉजी लिमिटेड, मनस्वी टेक सोल्युशन्स प्रा. लि., ईगलबाइट सोल्युशन्स प्रा. लि., क्यूस्पायडर सॉफ्टवेअर सोल्युशन, लॉजिपूल इन्फोटेक, एपिटोम कंपोनेंट्स प्रा. लि. (अहिल्यानगर), फ्लेअर्स सोलर पीव्ही सिस्टीम्स आणि जी.एस. इंडस्ट्रीज या इलेक्ट्रॉनिक्स व टेलेकम्युनिकेशन क्षेत्रातील अग्रगण्य कंपन्यांचा समावेश होता. विद्यार्थ्यांची प्रथम योग्यता चाचणी घेण्यात आली. त्यानंतर तांत्रिक चाचणी आणि प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना सरासरी ₹४ लाख, तर सर्वोच्च ₹६.५ लाख वार्षिक पॅकेजची ऑफर मिळाली आहे. स्नेहल पांडुरंग कोतकर हिची कोरिझो प्रायव्हेट लिमिटेड, पुणे या कंपनीत सर्वोच्च पॅकेजसह निवड झाली. ती म्हणाली, ''ही संधी माझ्या करिअरला दिशा देणारी आहे. कॉलेजमध्ये वेळोवेळी झालेल्या सेमिनार, वर्कशॉप, व्यक्तिमत्व विकास, बुद्धिमत्ता चाचणी आणि मुलाखत कौशल्याच्या प्रशिक्षणामुळे हे यश शक्य झाले. या यशामध्ये माझ्या शिक्षकांचे, पालकांचे आणि प्लेसमेंट सेलचे मोठे योगदान आहे.'' या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन व राज्याचे जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे, मुख्य कार्यकारी अधिकारी माजी खासदार डॉ. सुजय विखे, डायरेक्टर जनरल प्रशासन डॉ. पी. एम. गायकवाड, डायरेक्टर टेक्निकल प्रा. सुनिल कल्हापुरे, प्राचार्य डॉ. रविंद्र नवथर, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलेकम्युनिकेशन विभाग प्रमुख डॉ. अनिता पाटील, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी प्रा. सुदर्शन दिवटे, तसेच शिक्षक समन्वयक प्रा. अमोल लांडगे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.



# परवानाधारक ऑटोरिक्षा चालकांना न्याय द्या

## जिल्हा ऑटो रिक्षा, टॅक्सी चालक-मालक संघटनेची मागणी

**अहमदनगर । प्रतिनिधी**

शहरातील प्रायव्हेट स्क्रॅप ऑटो रिक्षा कायमस्वरूपी बंद करून या रिक्षा चालकांची दादागिरी बंद करावी व परवानाधारक ऑटो रिक्षा चालकांना न्याय देण्याच्या मागणीसाठी अहिल्यानगर जिल्हा ऑटो रिक्षा व टॅक्सी चालक-मालक संघटनेच्या वतीने वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक यांना निवेदन देताना संघटनेचे अध्यक्ष अविनाश घुले, उपाध्यक्ष दत्ता वामन, कार्य अध्यक्ष विलास कराळे, सरचिटणीस अशोक औषिकर, सुलेमान शेख, सुधाकर साळवे, अन्वर सय्यद, आमीन सय्यद, अनिल वैरागर, पीटर लोंढे, विजय उमाप, सादिक शेख, सचिन जाधव, अंतोन लोंढे, मच्छिंद्र दांगट, राज शेख, फरहान शेख, जुनेद बागवान, बाबासाहेब साळवे, फरिद सय्यद, फारुख शेख आदीसह रिक्षाचालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढे निवेदनात म्हंटले आहे की, अहिल्यानगर शहरामध्ये प्रायव्हेट स्क्रॅप रिक्षा याची कोठेही नोंद नसलेल्या आरटीओ ऑफिस मधील अधिकृत स्क्रॅप केलेल्या २ हजार ऑटोरिक्षा राजरोसपणे व्यवसाय करतात त्यामध्ये त्यांच्याकडे परवाना, लायसन, बॅच नाही बरेचसे गुन्हेगार लूट करणारे दारू पिऊन परवानाधारकांना मारहाण करणारे आहे. शासनाने आज मुक्त परवाना धोरण अवलंबलेले आहे आज ५ हजार ५०० परवानाधारक ऑटो रिक्षा आहेत ते शासनाला १० हजार रुपये परवाना फी भरतात, इन्शुरन्स भरतात, पासिंग फी भरतात, लायसन बॅच काढतात आज नवीन ऑटो रिक्षा ची किंमत ४ लाख रुपये आहे स्क्रॅप रिक्षा ६ हजार रुपयांनी घेऊन तुकडे केलेल्या रिक्षा घेऊन जोडून रिपेअर करून राज रोज पणे व्यवसाय करतात मग परवानाधारक रिक्षा चालकांनी नवीन रिक्षा घेऊन सर्व नियमाचे पालन का करावे? आज परवानाधारक ऑटो रिक्षा चालकांचा व्यवसाय संपूर्णपणे उध्वस्त झालेला आहे. शासनाच्या पासिंग परवाना इतर फी भरणे मुश्किल झालेले आहे. मुलांच्या शिक्षणाचा खर्च घर खर्च भागवणे अवघड झालेले आहे असे असताना संबंधित सर्व अधिकाऱ्यांना निवेदन देऊन सक्षम भेटून वरील अधिकारी कुठल्याही प्रकारे कारवाई करत नाही स्क्रॅप प्रायव्हेट गाडी जप्त केल्या नंतर त्या गाड्या लावण्यासाठी जागा नाही म्हणून एक दुसऱ्याकडे बोट दाखवतात त्यांच्याकडे परवानाधारक ऑटो रिक्षावर कारवाई करण्यासाठी वेळ आहे पण स्क्रॅप व प्रायव्हेट रिक्षासाठी वेळ नाही ते फक्त परवानाधारक रिक्षावरच कारवाई करतात आज ७ हजार रिक्षांसाठी थांबे नाहीत या रिक्षा कोठे लावायच्या हा विचार करण्यास शासनाला वेळ नाही जर प्रायव्हेट स्क्रॅप रिक्षा बंद केले नाही व जो रिपेअर करून देतो जो व्यक्ती अशा रिक्षा चालवतो त्यांच्यावर येत्या आठ दिवसात कारवाई केली नाही तर नगर शहरातील सर्व परवाना ऑटो रिक्षा चालक रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

# दिव्यांग व्यक्ती हा समाजातील एक संघर्षशील घटक- ॲड. धनंजय जाधव

## वाढदिवसानिमित्त दिव्यांग विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

**अहमदनगर । प्रतिनिधी**

दिव्यांग व्यक्ती हा समाजातील एक संघर्षशील घटक असून, आपल्या जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या बळावर ते अशक्य वाटणाऱ्या उंची गाठतात. त्यांच्या प्रगतीसाठी आपण सर्वांनी एक पाऊल पुढे टाकले पाहिजे, असे प्रेरणादायी विचार ॲड. धनंजय जाधव यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त व्यक्त केले. जंगूभाई तालीम ट्रस्टच्या वतीने आयोजित विशेष उपक्रमात, अनाम प्रेम संस्थेतील दिव्यांग विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.



हा उपक्रम सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून राबवण्यात आला असून, सण, उत्सव आणि वाढदिवस हे केवळ वैयक्तिक आनंदाचे क्षण न ठेवता, समाजोपयोगी कार्य घडावे हीच खरी संस्कृती असल्याचे ॲड. जाधव यांनी नमूद केले. या उपक्रमात शालेय साहित्याचे वाटप मितेश शहा, तेजस कथडे, पवन गुंदेचा, सचिन डुंगरवाल आणि विश्वजीत बोरा यांच्या वतीने करण्यात आले. कार्यक्रमास रोहन सानप, सिद्धार्थ मुथियान, राहुल मुथा, आदिनाथ जाधव, सोमनाथ जाधव, योगेश साबळे, प्रशांत दारकुंडे, साहिल ओस्तवाल, धनेश खत्ती, शिवदत्त पांढरे, पुरुषोत्तम सब्बन, ज्ञानेश्वर दौंडकर, स्वप्निल अंकम, राहुल गोंधळे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना ॲड. धनंजय जाधव म्हणाले, ''समाजामध्ये वावरताना आपल्याला समाजाचे काही देणे लागते, या भावनेतून प्रत्येकाने समाजोपयोगी कार्य करणे आवश्यक आहे. सण, उत्सव वा वाढदिवस केवळ स्वतःसाठी साजरे न करता, दुसऱ्याच्या चेहऱ्यावर हसू फुलवण्यासाठी साजरे करावेत.'' या उपक्रमाच्या माध्यमातून समाजात सकारात्मकतेचा संदेश पोहोचवण्याचा आणि दिव्यांग विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. उपस्थित सर्वांनी या उपक्रमाचे भरभरून कौतुक करत ॲड. जाधव यांच्या सामाजिक जाणीवेचे अभिनंदन केले.

# वाचनसंस्कृती रुजविणारी ज्ञानप्रसाराची चळवळ प्रेरणादायी- संजय सपकाळ

## तेजज्ञान फाउंडेशनच्या ग्रंथरथाचे उद्घाटन

**भिंगार। प्रतिनिधी**

तेजज्ञान फाउंडेशनच्या वतीने साकारण्यात आलेल्या ग्रंथ रथ या अभिनव उपक्रमाचे भिंगार शहरात जल्लोषात स्वागत करण्यात आले. वाचनसंस्कृती रुजविण्याबरोबरच समाजात सकारात्मक विचारांची प्रेरणा देणाऱ्या या ग्रंथ रथाचे उद्घाटन हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ यांच्या हस्ते करण्यात आले. या उपक्रमांतर्गत तेजज्ञान फाउंडेशनने प्रकाशित केलेली हॅपी थॉट्स ही प्रेरणादायी पुस्तके, विविध विषयांवरील ग्रंथसंपदा, तसेच महापुरुषांच्या चरित्रांचा खजिना वाचकांसाठी उपलब्ध करून देण्यात आला आहे. संपूर्ण भिंगार शहरात हा ग्रंथ रथ सवलतीच्या दरात पुस्तके उपलब्ध करून देत आहे. या उद्घाटनप्रसंगी सुनील (भाऊ) कर्डिले, वसंत



राठोड, रावसाहेब कोकणे, चंद्रशेखर देशपांडे, कृष्णन नायर, केशव कराळे, रुक्मिणी नायर, रमेश वराडे, सुभाषराव सोनवणे, हेमंत खरे, गोरक्ष दळवी, विजय कांबळे, किरण धाडगे, सुनील बिदे, राजेंद्र सांगळे, सुभाष दिघे, किरण शिंदे, हेमंतकुमार बोरसे आदी उपस्थित होते. संजय सपकाळ म्हणाले, ''तेजज्ञान फाउंडेशनने वाचनसंस्कृती रुजवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य सुरू केले आहे. मोबाईलमध्ये गुंतलेल्या पिढीला सकारात्मक विचारांची दिशा देण्यासाठी 'हॅपी थॉट्स' आणि महापुरुषांचे विचार प्रभावी ठरणार आहेत.

''ही चळवळ प्रेरणादायी असून, फक्त पुस्तकविक्री नाही, तर समाज परिवर्तनाचा संदेश घेऊन पुढे सरसावलेली आहे. सण, उत्सव, वाढदिवस अशा प्रसंगी समाजोपयोगी कार्य घडावे, ही खरी संस्कृती आहे,'' असेही त्यांनी नमूद केले. फाउंडेशनचे संस्थापक तेजगुरू सरश्री यांनी पुणे येथून सुरू केलेली ही चळवळ आज भारतासह विदेशातही विस्तारली आहे. २५ वर्षांपासून फाउंडेशन हॅपी थॉट्स ग्रंथांचा प्रचार-प्रसार करत आहे. भारतात ४५० केंद्रे आणि विदेशात २५ केंद्रे कार्यरत आहेत. हॅपी थॉट्सची ४०० पेक्षा अधिक पुस्तके सात भाषांमध्ये प्रकाशित झाली असून जगभर त्याला मागणी आहे. यासोबतच पुस्तकप्रदर्शन, रक्तदान शिबिर, वृक्षारोपण, आणि सामाजिक विषयांवरील जनजागृतीचे उपक्रमही राबवले जात आहेत. या माध्यमातून सामाजिक, आर्थिक, शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक क्रांती घडवण्याचे कार्य तेजज्ञान फाउंडेशन करीत आहे.

# गोवंशहत्या थांबवायची असेल तर विक्रीवरही बंदी आणा- डॉ. अशरफी

**अहमदनगर । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात गौवंश हत्याबंदी कायदा लागू असून त्याची अंमलबजावणी शासन आणि पोलीस प्रशासनाकडून मोठ्या प्रमाणात केली जात आहे. मात्र केवळ वाहतूक करणाऱ्यांवर व कत्तल करणाऱ्यांवर कारवाई करून ही अंमलबजावणी अपुरी ठरत आहे, असा आरोप एमआयएमचे अहमदनगर जिल्हाध्यक्ष डॉ. परवेज अशरफी यांनी केला आहे. डॉ. अशरफी म्हणाले, ''गौवंश हत्याबंदी कायदा अस्तित्वात असताना बाजारात सर्रासपणे गायी आणि वासरे विकली जात आहेत. जोपर्यंत विक्रीस बंदी नाही, तोपर्यंत कत्तल रोखणे अशक्य आहे. हे अगदी गुटखाबंदीप्रमाणेच आहे. विक्री बंद आहे, पण उत्पादन व निर्यात सुरूच आहे.'' गौवंश विक्रीवर कायदेशीर बंदी घातल्यास त्याच्या वाहतुकीचा आणि कत्तलीचा प्रश्नच निर्माण होणार नाही. त्यामुळे कायद्यात आवश्यक बदल करून, गाय आणि वासरांच्या विक्रेत्यांवरही कारवाईची तरतूद करावी, अशी मागणी त्यांनी केली. डॉ. अशरफी यांनी गौशाळांच्या कारभारावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ''पोलिस किंवा स्वयंघोषित गोरक्षक संघटनांकडून पकडलेली जनावरे न्यायालयाच्या आदेशानुसार गौशाळांमध्ये पाठवली जातात. मात्र तिथे कोणतेही स्वतंत्र ऑडिट होत नाही. त्यामुळे जनावरे खरोखरच सुरक्षित आहेत का, की त्यांची पुन्हा कुठे विक्री केली जाते, याची खात्री नसते,'' असे त्यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की, ''अलीकडे बीड जिल्ह्यात पकडलेली जनावरे एका व्यक्तीला न्यायालयाच्या आदेशानंतर परत मिळायला हवी होती. मात्र जेव्हा तो व्यक्ती जनावरे घ्यायला गेला, तेव्हा त्याला ती जनावरे मिळाली नाहीत, त्याऐवजी दुसरी जनावरे देण्यात आली. यावरून गौशाळांमधून जनावरे गायब होतात, हे स्पष्ट होते.''



गौशाळांमध्ये जनावरांचे मृत्यू कसे होतात? मृत्यूचे प्रमाण किती आहे? आणि खरोखर न्यायालयाच्या आदेशानंतर संबंधितांना त्यांची जनावरे परत मिळतात का? या सर्व प्रश्नांची सखोल चौकशी व्हावी, अशी मागणीही डॉ. अशरफी यांनी केली. या संदर्भात त्यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री अजित पवार, गृहमंत्री, अल्पसंख्याक आयोग, पोलीस महासंचालक, जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक आणि पालकमंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे. ''जर गौवंश विक्रीच बंद केली, तर कोणीही वाहतूक करणार नाही, आणि त्यामुळे कत्तल होण्याचाही प्रश्न उद्भवणार नाही. यासाठी कायद्यात योग्य ते बदल करावेत, ही जनतेची मागणी आहे,'' असे त्यांनी स्पष्ट केले.

रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

**भाड्याने देणे**
परिचय हॉटेलजवळ, बालिकाश्रम रोडवर कॉर्पोरेट ऑफिस, बँक, शोरूम, क्लिनिक आदींसाठी ८०० स्क्वेअर फुटाचे दोन मजले बांधलेली जागा भाड्याने देणे आहे.
**- संपर्क -**
८८८८३४७४११

निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.



**मे. रुपाली एजन्सी**
फुड प्रॉडक्ट मटेरियल सप्लायर्स
राधिका लॉजजवळ, तापकीर लेन, आडत बाजार, अहमदनगर - ४१४००१.
(०२४१) २३४३०६०, ९८२२८४३०६०
ई-मेल - rupaliagency@gmail.com

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
**जगदंबा टी सेंटर**
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com** , **उपसंपादक : दिपक शिरसाठ**, 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा**, 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक**, 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# शिक्षकांच्या मागण्यांसाठी राज्यभर आंदोलन करणार- राजेंद्र निमसे

## शिक्षक संघाची कार्यकारिणी सभा संपन्न



**अहमदनगर । प्रतिनिधी**

अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाची राज्य कार्यकारिणी सभा प्रथमेश मंगल कार्यालय, टिटवळा (पूर्व), कल्याण येथे संपन्न झाली. या बैठकीत प्राथमिक शिक्षकांच्या विविध प्रलंबित मागण्यांबाबत सखोल चर्चा करण्यात आली.

राज्य शासन त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करत असल्यामुळे लवकरच राज्यभर धरणे आंदोलन छेडण्यात येणार असल्याची माहिती राज्य संयुक्तसचिव राजेंद्र निमसे यांनी दिली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी संघाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष व राज्याध्यक्ष देविदास बसवदे होते. यावेळी राज्य सरचिटणीस कल्याण लवांडे, राज्य सल्लागार सुरेश भावसार, विश्वनाथ सूर्यवंशी, किरण पाटील, दीपक भुजबळ, संतोष कदम, प्रमोद पाटील, विजय मन्वर, माया चाफले, महादेव देसाई, भगवान पाटील आदी पदाधिकारी उपस्थित होते. संघाने मांडलेल्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे आहेत: संचमान्यता रद्द करण्यासाठी जिल्हानिहाय न्यायालयीन प्रक्रिया सुरू करणे, बीएलओची कामे ऐच्छिक करणे, शिक्षण सेवक पद रद्द करणे, समान कामासाठी समान वेतन, रिक्त पदांची भरती, पदवीधर शिक्षकांना अतिरिक्त न ठरवणे, वरिष्ठ व निवड वेतनश्रेणी लागू करणे, पोषण आहाराच्या देयकांना मंजुरी, रखडलेली परीक्षा घेणे, १०-२०-३० पदोन्नती योजना,NET/SET/Ph.D धारकांना प्रशासकीय सेवेत समावेश आणि कॅशलेस मेडिक्लेम योजना तात्काळ लागू करणे.

या मागण्यांसाठी शासनाला लवकरच ठोस निवेदन दिले जाणार आहे. या निर्णयांचे स्वागत राज्य संघटक बाळासाहेब कदम, जिल्हाध्यक्ष शरद वांढेकर, प्रदीप चक्रनारायण, सुनील शिंदे, विलास लवांडे, सुधीर बोऱ्हाडे, सुरेश नवले, सुधीर रणदिवे, दत्तात्रय परहर, रामप्रसाद आव्हाड, शिवाजी ढाकणे, संदीप भालेराव, अनिता उदबत्ते, पांडुरंग देवकर, भारत शिरसाठ आदींनी केला.



# बच्चू कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनास प्रहार दिव्यांग संघटनेचा पाठिंबा

**राहुरी । दत्ता जोगदंड**

प्रहार जनशक्ती पक्ष आणि प्रहार दिव्यांग संघटनेचे संस्थापक अध्यक्ष, माजी राज्यमंत्री बच्चू कडू हे शेतकरी आणि दिव्यांगांच्या विविध मागण्यांसाठी ८ जूनपासून मोझरी (जि. अमरावती) येथे अन्नत्याग आंदोलन करत आहेत. आज आंदोलनाचा सहावा दिवस असून, राज्य शासनाने अद्याप कोणतीही सकारात्मक दखल घेतलेली नाही, अशी माहिती प्रहार दिव्यांग संघटनेच्या जिल्हा व तालुका पदाधिकाऱ्यांनी दिली. या आंदोलनास पाठिंबा दर्शवत, अहिल्यानगर जिल्हा प्रहार दिव्यांग संघटना व राहुरी तालुका प्रहार दिव्यांग संघटनेच्यावतीने राहुरीचे तहसीलदार नामदेव पाटील आणि पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांना निवेदन देण्यात आले.

या निवेदनात आंदोलनाच्या मागण्या शासनापर्यंत पोहोचवण्याची मागणी करण्यात आली असून, ''गेंड्याच्या कातडीसारखे सरकार अजूनही मौन बाळगून आहे,'' अशी तीव्र टीका यावेळी करण्यात आली. प्रहार संघटनेने स्पष्ट केले की, बच्चू कडू आपल्या १७ प्रमुख मागण्यांवर ठाम असून, शासनाने १४ जूनपूर्वी निर्णय न घेतल्यास अहिल्यानगर येथील जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे. यावेळी काही दिव्यांग बांधव उपोषणासहीत आंदोलनात सहभागी होणार असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष मधुकर घाडगे यांनी दिली. तसेच, हे आंदोलन संपूर्ण महाराष्ट्रभर वेगवेगळ्या स्वरूपात उभारले जाणार असून, त्याच्या परिणामी उद्भवणाऱ्या परिस्थितीस शासन जबाबदार असेल, असा इशाराही त्यांनी दिला. आंदोलनातील प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे आहेत.

संजय गांधी पेन्शन आणि महानगरपालिकेच्या दिव्यांग अनुदान (पेन्शन) मध्ये वाढ करून रक्कम किमान ₹६०००/- करण्यात यावी. शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचे सरकारचे निवडणूकपूर्व आश्वासन तातडीने पूर्ण करण्यात यावे. याशिवाय आणखी १७ महत्त्वाच्या मागण्या शासनाने मान्य करून त्यांची अंमलबजावणी त्वरित करावी, अन्यथा महाराष्ट्रभर ''प्रहार स्टाईल''ने आंदोलन उभे केले जाईल, असे आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले. उत्तर अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष मधुकर घाडगे, जिल्हा सल्लागार सलीम शेख, तालुकाध्यक्ष योगेश लबडे, तालुका सचिव दत्तात्रय खेमनर, सुरेश दानवे, नानासाहेब शिंदे, जुबेर शेख, जालिंदर भोसले, विजय म्हसे, बाबासाहेब मुसळे, सतीश तरवडे, भरत आढाव, सचिन साळवे, सुरेश जगधने, मेजर नानासाहेब खपके, चंद्रकांत रेबडे, विठ्ठल पांडे, जगन्नाथ हापसे, शिवाजी जाधव, प्रतीक धिमते, संदीप कुलकर्णी, योगेश पवार, बापू निमसे आदींसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# अळिंबीचा आहारात 'सुपरफूड' म्हणून समावेश आवश्यक- डॉ. सुधाकर पांडे

**राहुरी । प्रतिनिधी**

भारत अन्नधान्य उत्पादनात अग्रगण्य असून, आता पौष्टिक अन्न सुरक्षा ही काळाची गरज बनली आहे. या दृष्टीने अळिंबीचा आपल्या दैनंदिन आहारात सुपरफूड म्हणून समावेश करणे अत्यावश्यक असल्याचे मत भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या उद्यानविद्या विभागाचे सहाय्यक महासंचालक डॉ. सुधाकर पांडे यांनी व्यक्त केले. कृषी महाविद्यालय, पुणे येथे अखिल भारतीय समन्वित अळिंबी संशोधन प्रकल्पांतर्गत आयोजित २७ व्या वार्षिक बैठकीत ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के होते. डॉ. पांडे पुढे म्हणाले, ''अळिंबीचे पोषणमूल्य आणि औषधी गुणधर्म अत्यंत महत्त्वाचे आहेत. शिवाय अळिंबी उत्पादनासाठी आवश्यक पाण्याचे प्रमाण कमी असून प्रक्रिया व मूल्यवर्धनही अल्प खर्चिक आहे. यामुळे अळिंबी उत्पादनाला प्रोत्साहन देणे गरजेचे आहे.'' कार्यक्रमात भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या पुष्प विज्ञान प्रकल्पाचे संचालक डॉ. के. व्ही. प्रसाद, अळिंबी प्रकल्पाचे समन्वयक डॉ. वेदप्रकाश शर्मा, कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता




डॉ. महानंद माने आणि अळिंबी प्रकल्पाचे प्रमुख डॉ. राजेंद्र खडतरे हे मान्यवर मंचावर उपस्थित होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. विठ्ठल शिर्के म्हणाले, ''अळिंबी उत्पादनासाठी लागणारी मर्यादित संसाधने आणि कमी भांडवली खर्चामुळे ग्रामीण व अर्धशहरी भागातील शेतकऱ्यांसाठी हे एक उत्पन्नवर्धक व रोजगार निर्मितीचे साधन ठरू शकते. हे उत्पादन सेंद्रिय आणि शाश्वत शेतीच्या अनुषंगाने अधिक प्रभावी ठरू शकते. या क्षेत्रात अधिक संशोधनाची गरज आहे.'' डॉ. के. व्ही. प्रसाद यांनी देखील अळिंबीचे आहारातील प्रमाण वाढवण्याचे महत्त्व अधोरेखित केले. डॉ. वेदप्रकाश शर्मा यांनी देशभरात सुरु असलेल्या अळिंबी संशोधन प्रकल्पांची माहिती देत त्याचा प्रगती अहवाल सादर केला. कार्यक्रमात इंदिरा गांधी कृषि विद्यापीठ, रायपूर यांना उत्कृष्ट संशोधन कार्याबद्दल, तर डॉ. राजेंद्र प्रसाद केंद्रीय कृषि विद्यापीठ, समस्तीपूर यांना उत्कृष्ट विस्तार कार्याबद्दल गौरवण्यात आले. त्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक देण्यात आले. यावेळी अळिंबी संशोधन, उत्पादन तंत्रज्ञान व प्रशिक्षण या विषयांवरील विविध प्रकाशनांचे प्रकाशनही करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. महानंद माने यांनी केले, सूत्रसंचालन डॉ. पल्लवी सूर्यवंशी यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. राजेंद्र खडतरे यांनी केले. या बैठकीस देशभरातील विविध अळिंबी संशोधन प्रकल्पांचे शास्त्रज्ञ, विद्यार्थी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे शेती करणे गरजेचे- पंजाबराव डख

**पाथर्डी । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांनी माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे पिकपद्धती आणि दैनंदिन हवामानाकडे लक्ष देत शेती केल्यास भविष्यात त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडतील, असे मत हवामानतज्ज्ञ पंजाबराव डख यांनी व्यक्त केले. पाथर्डी येथील श्री विश्वविनायक मल्टिस्टेटच्या सातव्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित शेतकरी संवाद मेळाव्यात ते बोलत होते. नगर जिल्ह्यासह पाथर्डी तालुक्यात येत्या काही दिवसांत समाधानकारक पावसाची शक्यता असून, शेतकऱ्यांनी लवकर आणि भरघोस उतारा देणाऱ्या चांगल्या वाणांची निवड करून पेरणी करावी, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. डख पुढे म्हणाले की, शेतकऱ्यांनी निसर्गातील बदलांचा अभ्यास करावा. आपल्या आजूबाजूचे पक्षी, झाडे, पाने आणि फुले ही निसर्गातील बदलांचे संकेत देत असतात. २०२५ मध्ये समाधानकारक पाऊस होणार असला तरी २०२६ मध्ये पावसाचे प्रमाण कमी-जास्त होण्याची शक्यता आहे. तसेच, विजांचा कडकडाट होण्याचा इशारा लक्षात घेऊन शेतकऱ्यांनी खबरदारी घ्यावी, असेही




त्यांनी स्पष्ट केले. शेती करत असताना नव्या साधनांचा आणि माहिती तंत्रज्ञानाचा वापर करणे काळाची गरज आहे. शेतीची उत्पादनक्षमता वाढवण्यासाठी कृषी विद्यापीठांना भेट देऊन तेथील तंत्रज्ञान आत्मसात करावे, असे डक यांनी सांगितले. शेती ही आता जागतिक व्यापाराचा विषय झालेली असून, त्यामुळे घेतलेल्या पिकाची गुणवत्ता अत्यंत महत्त्वाची ठरते. पिकांचे नियोजन करताना दैनंदिन हवामान लक्षात घेऊन मशागतीची कामे करावीत, असे त्यांनी नमूद केले. शेतीच्या उत्पादन खर्चामध्ये बचत कशी करता येईल, याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले. यावेळी अनेक शेतकऱ्यांनी डख यांना शेतीविषयक प्रश्न विचारून आपले समाधान करून घेतले. त्यांनी विविध पिकांच्या चांगल्या प्रतीच्या बियाण्यांची माहिती शेतकऱ्यांना दिली. या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष मोदक शहाणे, माजी नगरसेवक बंडू बोरुडे, अनिल उदावंत, सुनील शहाणे, ॲड. हरिहर गर्जे, भगवान साठे, मंगल कोकाटे, मधुकर शहाणे, बाळासाहेब डोंगरे, बाळासाहेब जिरेसाळ, संजय दराडे, परमेश्वर टकले, प्रकाश बोरुडे, शिवाजी मरकड, विठ्ठल बडे, शंकरराव हाडके, अण्णासाहेब आंधळे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी संस्थेचे चेअरमन मोदक शहाणे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# तिलोक जैन विद्यालय प्राचार्यपदी अजय भंडारी

**पाथर्डी । प्रतिनिधी**

शहरातील श्री. तिलोक जैन विद्यालयाच्या नूतन प्राचार्यपदी विद्यालयातील पर्यवेक्षक अजय भंडारी यांची पदोन्नतीने नियुक्ती करण्यात आली.

यापूर्वी त्यांचे वडील स्व. बन्सीलाल भंडारी यांनी १९८९ ते ९९ या दहा वर्षाच्या कालखंडामध्ये या विद्यालयाच्या प्राचार्यपदाची जबाबदारी सांभाळली होती. त्यांच्याच पावलावर पाऊल टाकत अजय भंडारी यांना ही संधी प्राप्त झाली. त्यांनी आपली सेवा संस्थेअंतर्गत माणिकदौंडी येथील रत्न जैन विद्यालय येथून सुरू केली



केली त्यानंतर तिलोक जैन विद्यालयामध्ये सहशिक्षक व पर्यवेक्षक पदावर कार्य केले. या सर्व कार्याची पावती म्हणून आज त्यांची पदोन्नतीने प्राचार्य पदी नियुक्ती झालेली आहे. श्री. तिलोक जैन विद्यालय हे महाराष्ट्रातील शताब्दी पूर्ण केलेले नामांकित विद्यालय म्हणून ओळखले जाते. त्यांचा पदग्रहण समारंभ श्री. तिलोक जैन ज्ञान प्रसारक मंडळाचे सचिव सतीश गुगळे, खजिनदार सुरेश कुचेरिया, विश्वस्त डॉ. ललित गुगळे, राजेंद्र मुथ्था, कार्यकारी मंडळाचे सदस्य डॉ. अभय भंडारी डॉ. सचिन गांधी, चांदमल देसर्डा यासह सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत संपन्न झाला यावेळी संस्थेचे सचिव सतिश गुगळे यांनी त्यांच्या भावी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुनिल कटारिया यांनी करून आभार प्राचार्य अजय भंडारी यांनी मानले.

# श्रीक्षेत्र राममाळ श्री सद्गुरु यशवंतबाबा पुण्यतिथीनिमित्त हरिनाम सप्ताह

**अकोले । प्रतिनिधी**

प्रतिआयोध्या श्रीक्षेत्र राममाळ, उंचखडक बु., ता. अकोले येथे श्री सद्गुरु यशवंतबाबा यांच्या ७८व्या पुण्यतिथीनिमित्त १६ ते २३ जून २०२५ या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही या धार्मिक सोहळ्याला तालुका व जिल्हाभरातून मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहणार आहेत.

अलीकडेच श्रीराम मंदिराचा कलशारोहण व मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा येथे मोठ्या उत्साहात पार पडला. त्यामुळे या पवित्र स्थळाचे महत्त्व अधिकच वाढले असून, अकोले तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यातून भाविक दर्शनासाठी येत आहेत. सोमवार, १६ जून रोजी सकाळी ९ वाजता योगी केशवबाबा चौधरी, ह.भ.प. मनोहरबाबा भोर व ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख (इंदोरीकर) यांच्या मार्गदर्शनाखाली घटस्थापना व धर्मध्वजारोहण सोहळ्याने सप्ताहाची सुरुवात होईल. संपूर्ण सप्ताहात दररोज संध्याकाळी ७ ते ९ दरम्यान नामवंत कीर्तनकारांच्या प्रबोधनात्मक कीर्तनांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच दररोज




भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहाची सांगता २३ जून रोजी होईल. या दिवशी सकाळी ८ ते १० दरम्यान दिंडी प्रदक्षिणा, तर त्यानंतर १० ते १२ दरम्यान ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख यांचे काल्याचे कीर्तन होईल. या कीर्तनानंतर समस्त बेलदार समाजातर्फे महाप्रसादाचे आयोजन राहणार आहे.

यंदाचा श्री सदुरू यशवंतबाबा वारकरी जीवनगौरव पुरस्कार (मरणोत्तर) वै. ह.भ.प. नामदेव भिकाजी देशमुख महाराज (सुगाव बु.) यांना प्रदान करण्यात येणार आहे. या भव्य सप्ताह सोहळ्यात अधिकाधिक भाविकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष दशरथ सावंत, उपाध्यक्ष अशोकराव देशमुख (चेअरमन, अगस्ती ग्रामीण बिगरशेती पतसंस्था), सरचिटणीस योगी केशवबाबा चौधरी, महंत विठ्ठलपंत गोंडे महाराज तसेच विश्वस्त मंडळातर्फे करण्यात आले आहे. धार्मिक परंपरेचा अभिमान आणि समाजजागृतीचा वारसा घेऊन हा सोहळा वारकरी परंपरेचा एक महत्त्वाचा भाग ठरणार आहे.

# रक्तदान सर्वश्रेष्ठ दान

आज १४ जून, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक रक्तदान दिन म्हणून साजरा केला जातो. ऑस्ट्रेलियातील डॉ कार्ल लॅंडस्टेनर या संशोधकाच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस जागतिक रक्तदाता दिन म्हणून साजरा केला जातो. १४ जून हा त्यांचा जन्मदिन आहे. डॉ कार्ल लॅंडस्टेनर यांनी एबीओ हा नवा रक्तगट शोधून काढला त्यांच्या या संशोधनासाठी त्यांना नोबेल पारितोषिक मिळाले होते. पहिला जागतिक रक्तदाता दिन २००५ साली साजरा झाला होता. त्यानंतर दरवर्षी हा दिवस साजरा केला जातो. प्रत्येक वर्षी एक सूत्र घेऊन हा दिवस साजरा केला जातो. माता सुरक्षा, रक्तदान श्रेष्ठ दान, डोनेट प्लेटलेट्स यासारखे सूत्र घेऊन त्याची माहिती या दिवशी दिली जाते. रक्तदानाचे आवाहन केले जाते. जागतिक आरोग्य संघटनेने घोषित केलेल्या या दिवसाच्या साजरीकरणात रेड क्रॉस सोसायटीचा हिरीरीने भाग असतो. कौन्सिल ऑफ युरोप ही संघटना देखील रक्तदाना संदर्भात मोठ्या प्रमाणात जनजागृती करते. आपल्या देशात देखील विविध शासकीय, सामाजिक, सेवाभावी संस्था या दिवसाचे आयोजन करून लोकांमध्ये रक्तदाना संदर्भात जनजागृती करतात. या दिवशी रक्तदात्यांच्या सन्मान केला जातो. रक्तदान शिबिराचे आयोजन केले जाते. रक्तदान श्रेष्ठ दान असं म्हटलं जातं कारण या दानामुळे माणसाचा जीव वाचतो. सुरक्षित रक्त ही अलीकडची वैश्विक समस्या निर्माण झाली आहे. दरवर्षी ९ कोटी युनिटपेक्षा अधिक रक्त दान केले जाते तरीही रक्ताचा तुटवडा जाणवतो. अपघातग्रस्त व्यक्ती, शस्त्रक्रिया झालेले व्यक्ती, रक्तातील त्रुटी असलेले व्याधीग्रस्त व्यक्ती, बाळंतपणात होणारे मातांचे मृत्यू आणि कुपोषण, विविध प्रकारचे बाळ मृत्यू, साथीचे आजार अशावेळी रक्ताची खूप गरज पडते. कोरोना काळात तर रक्ताचा कसा अभूतपूर्व तुटवडा जाणवला होता हे आपण पाहिलेच आहे. कोरोना काळात रक्तदान शिबिरे बंद असल्याने देशात रक्तदानाचा अभूतपूर्व असा तुटवडा जाणवला होता. रक्ताच्या तुटवड्यामुळे अनेक शस्त्रक्रिया पुढे ढकलाव्या लागल्या होत्या. पंतप्रधान आणि मुख्यमंत्री महोदयांनी नागरिकांना रक्तदान करावे असे आव्हान केले होते. भविष्यातही रक्ताचा असा तुटवडा निर्माण होऊ शकतो. आपल्या रक्तामुळे कोणाचा तरी जीव वाचतो. म्हणूनच रक्तदानाला सर्वश्रेष्ठ दान असे म्हणतात. रक्तदानाच्या रूपाने आपण मानवतेला एक मोठी देणगी बहाल करतो. रक्तदान केल्याने कोणतीही इजा किंवा दुष्परिणाम होत नाही.




मनुष्याच्या शरीरात ५ लिटर रक्त असते आणि रक्तदानात केवळ ३५० मिली इतकेच रक्त घेतले जाते त्यामुळे कोणतीही कमजोरी जाणवत नाही. विशेष म्हणजे २४ ते ४८ तासात जेवढे रक्त आपण दान दिले आहे तेवढे पूर्ववत होते. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने पुढे येऊन रक्तदान केले पाहिजे. रक्तदान सर्वश्रेष्ठ दान असे म्हणून प्रचार होत असला तरी आपल्याकडे रक्तदात्यांची संख्या खुपच कमी आहे. भारतात फक्त ०.६ टक्केच लोक रक्तदान करीत असतात. १३० कोटी लोकसंख्येच्या देशात हे प्रमाण खूप कमी आहे त्यामुळे देशात रक्ताची खूप कमतरता भासते त्यात कोरोना सारख्या महामारीत तर अभूतपूर्व परिस्थिती निर्माण होते. अपघातातील रुग्ण, प्रसव काळ, अतिदक्षता विभाग, तातडीच्या शस्त्रक्रिया अशा वेळी रक्ताची गरज निर्माण होते जर रुग्णांना वेळीच रक्त मिळाले नाही तर त्यांचा मृत्यूही होऊ शकतो त्यामुळे प्रत्येकाने सजग राहायला हवे. आपल्या रक्तामुळे कुणाचा तरी प्राण वाचणार आहे. रक्तदान म्हणजे जीवनदान, रक्तदान सर्वश्रेष्ठ दान हे लक्षात घेऊन प्रत्येकाने रक्तदान करायला हवे.



**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

**समाजसंवाद**



# मित्रत्व हेच बलस्थान- राजन लाखे

## माझी जीवनगंगा'चा प्रकाशन सोहळा उत्साहात

**पिंपरी । प्रदीप गांधलीकर**

''मित्रत्व हे माझ्या स्मृती माझी जीवनगंगा या आत्मकथनात्मक ग्रंथाचे खरे बलस्थान आहे!'' असे गौरवोद्गार महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या पिंपरी-चिंचवड शाखेचे अध्यक्ष राजन लाखे यांनी मंगळवारी काढले. कॅप्टन कदम सभागृह, निगडी प्राधिकरण येथे लेखक प्रकाश राऊळकर लिखित ग्रंथाच्या प्रकाशन सोहळ्यात ते बोलत होते. राजन लाखे यांनी या ग्रंथाचे कौतुक करताना सांगितले, ''जीवनातील अनेक व्यक्ती आपल्या वाटेवर विविध शिकवणी देतात. त्या सर्व अनुभवांचे गंगेप्रमाणे प्रवाही संचित म्हणजेच माझी जीवनगंगा! या ग्रंथातून जीवनाविषयीची कृतज्ञता आणि अनुभवांची साक्षेपी मांडणी दिसून येते.'' कार्यक्रमात ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. बसंत बंग, प्रकाशक दिलीप मराठे, तसेच लेखक प्रकाश राऊळकर व्यासपीठावर उपस्थित होते. डॉ. बसंत बंग यांनी राऊळकर यांच्याशी असलेल्या कौटुंबिक ऋणानुबंधांचा भावुक उल्लेख केला. ''प्रकाशकाका मुळेच मला 'वडील' म्हणजे काय, याची जाणीव झाली,'' असे सांगत त्यांनी राऊळकर यांना सामाजिक संपत्ती म्हणून गौरवले. लेखकाच्या कन्या तृप्ती देवरुखकर यांनी आपल्या मनोगतातून वडील, लेखक आणि तुकोबांच्या गाथा लिहिणाऱ्या कलाकार अशा अनेक पैलूंनी राऊळकर यांचा भावस्पर्शी परिचय करून दिला. प्रकाशक दिलीप मराठे यांनी राऊळकर यांचे जीवन हे संघर्ष, साहित्य आणि समर्पण यांचे सुंदर मिश्रण असल्याचे नमूद केले. स्वतः लेखक प्रकाश राऊळकर यांनी आपला लेखनप्रवास उलगडत सांगितले की, ''मी मूळतः रेखाटनकार आहे. पण करोना काळात जीवनातील आठवणी लिहिण्यास सुरुवात केली आणि त्या लिहिताना अनेक मित्रांनी दिलेल्या दादेमुळे लेखनाला बळ मिळाले.''कार्यक्रमाची सुरुवात गणेश वंदना आणि सरस्वती पूजनाने झाली. मान्यवरांचे औक्षण करून स्वागत करण्यात आले. सुमारे १९७२ पासूनचे सहकारी, मित्र आणि आप्तेष्ट मोठ्या संख्येने उपस्थित होते. गिरीश चौक यांनी मनोगतपूर्ण सूत्रसंचालन केले तर लेखकांनी आभारप्रदर्शन करत उपस्थितांचे मन:पूर्वक आभार मानले.

# खाजगी सावकाराच्या जाचाला कंटाळून शेतकऱ्याची आत्महत्या

## पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांनी उघडावी व्यापक मोहिम

**पाथर्डी । प्रतिनिधी**

धायतडकवाडी येथील बाबासाहेब नामदेव धायतडक (वय ४६) या शेतकऱ्याने खाजगी सावकाराच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना गुरुवारी सकाळी उघडकीस आली. बाळासाहेब बबन गर्जे (रा. अकोला) या सावकाराकडून घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीनंतरही चालू असलेल्या दमदाटी व धमक्यांमुळे धायतडक यांनी लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन जीवन संपवले.

प्राथमिक माहितीप्रमाणे, बाबासाहेब धायतडक यांनी गाई खरेदीसाठी गर्जे यांच्याकडून दहा टक्के व्याजदराने सहा लाख रुपयांचे कर्ज घेतले होते. त्यापैकी पाच लाख रुपये त्यांनी व्याजासह परत केले होते. मात्र, उर्वरित एक लाख रुपयांसाठी गर्जे सतत दबाव टाकत होते. ''पाच लाख रुपये दे नाहीतर जमीन माझ्या नावावर कर'' अशी धमकी देत ते धायतडक यांना त्रास देत होते. याच दरम्यान, ११ व १२ जून रोजी देखील गर्जे यांनी त्यांना शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिली होती. या मानसिक त्रासाला कंटाळून धायतडक यांनी आत्महत्येपूर्वी एक चिठ्ठी लिहून गावातील नवनाथ धायतडक यांच्या मोबाईलवर व्हॉट्सॲप केली. ''गर्जे मला मारणार होता, त्याच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या करतोय'' असे त्यांनी स्पष्टपणे लिहिले होते. नवनाथ यांनी ही माहिती धायतडक यांच्या मुलाला दिली. दोघांनी शोध घेतला असता, डोंगराच्या कडेला त्यांची मोटारसायकल दिसून आली. पुढे शोध घेतल्यावर शेतात लिंबाच्या झाडाला गळफास घेतलेले त्यांचे प्रेत आढळले. तातडीने पाथर्डी उपजिल्हा रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

या प्रकरणी धायतडक यांचा मुलगा सचिन यांनी पाथर्डी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. आरोपी बाळासाहेब गर्जे विरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, या घटनेच्या दिवशीच विलास पुजारी यांनी पाथर्डी पोलिस ठाण्याचा प्रभारी म्हणून पदभार स्वीकारला होता. त्यांनी या प्रकरणाचा तपास स्वतःकडे घेतला आहे. चिठ्ठी झाली व्हायरल: बाबासाहेब धायतडक यांनी आत्महत्येपूर्वी लिहिलेली चिठ्ठी गावातील व्हॉट्सॲप ग्रुपवरही व्हायरल झाली असून त्यामुळे गावात हळहळ व्यक्त केली जात आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्येला जबाबदार कोण? या घटनेमुळे खासगी सावकारीच्या वाढत्या विळख्यामुळे शेतकरी आत्महत्या करत असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. नूतन जिल्हा पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांनी तत्काळ कठोर पावले उचलून जिल्ह्यातील खाजगी सावकारी बंद करून पीडित कुटुंबाला न्याय द्यावा, अशी मागणी होत आहे.

# ओपनस्पेसवरील श्री अय्यप्पा मंदिराचा ३१ वा वर्धापनदिन उत्साहात साजरा

## शोभायात्रा ठरली विशेष आकर्षण





**अहमदनगर । प्रतिनिधी**

सावेडी पोलिस कॉलनी ओपनस्पेसवरील श्री अय्यप्पा मंदिराचा ३१ वा वर्धापनदिन मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात साजरा करण्यात आला. मंदिर समितीच्या वतीने या विशेष दिवसानिमित्त पहाटेपासून संध्याकाळपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

मंदिर समितीचे अध्यक्ष के.के. शेट्टी यांनी दिलेल्या माहितीनुसार, सकाळी महागणपती हवन, उषा पूजा, महामृत्युंजय हवन, कलश पूजा, अभिषेकम व उच्च पूजा अशा विधींनी वातावरण आध्यात्मिक रंगात रंगले. सायंकाळी पार पडलेली भव्य शोभायात्रा म्हणजे तालापोल्ली, सावेडीकरांसाठी विशेष आकर्षण ठरली. पारंपरिक वेशभूषेत महिलांनी मोती रंगाच्या साड्या परिधान करून हातात फुलांनी सजवलेली ताटे, अर्धा नारळ व प्रज्वलित दिवा घेऊन सहभाग घेतला. पारंपरिक वाद्यवृंदात 'चेंडमेलम' सादर करण्यात आला ज्याने वातावरणात भक्तीरस निर्माण झाला.

मंदिराच्या परिसरात फुलांची सजावट व दिव्यांनी केलेली रोषणाई भक्तांचे लक्ष वेधून घेत होती. शोभायात्रेची सांगता मंदिरात झाली आणि त्यानंतर भगवती सेवा, पुष्पाभिषेकम, अथर्झा पूजा पार पडली. यानंतर उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या उत्सवाला अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली असून, स्थानिक नागरिक आणि भाविकांनीही मोठ्या संख्येने सहभाग घेत उत्सवाची शोभा वाढवली.



# विद्यार्थ्यांना थेट लाभ होणे गरजेचे अरुण भांगरे यांची भावना

## वरिष्ठ व निवड वेतनश्रेणी प्रशिक्षण उत्साहात पार पडले

**अकोले । प्रतिनिधी**

वरिष्ठ व निवड वेतनश्रेणी प्रशिक्षण हे शिक्षकांच्या व्यावसायिक विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे असून, या प्रशिक्षणाचा थेट फायदा विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे, अशी भावना जिल्हा प्रशिक्षण समन्वयक अरुण भांगरे यांनी व्यक्त केली. तीन महिन्यांपासून तयारी सुरू असलेले हे प्रशिक्षण अकोले येथील अगस्ती महाविद्यालयात उत्साहात संपन्न झाले. राज्य शैक्षणिक व संशोधन प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील १२ व २४ वर्षे सेवा पूर्ण केलेल्या शिक्षकांसाठी हे १० दिवसीय प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. अभ्यासक्रमात राष्ट्रीय शिक्षण धोरण, भारतीय ज्ञान प्रणाली, मूल्यांची रुजवणूक, शालेय अभिलेख, शिक्षक सक्षमीकरण, पर्यावरण शिक्षण, आपत्ती व्यवस्थापन, तनाव व्यवस्थापन तसेच सेवा हमी कायदा यांसारख्या विविध विषयांचा समावेश होता. या प्रशिक्षणात सविता कचरे, महेश पाडेकर, चंद्रशेखर हासे, दीपक पाचपुते, सचिन वाकचौरे, अरविंद सगभोर, संतोष वाकचौरे, भाऊसाहेब पुरी, दीपक लोंढे, संदीप कोते, हरिबा चौधरी, भरत लोहकरे, मारुती बांडे, मनीषा रांधवन आदी तज्ञ सुलभकांनी प्रभावी मार्गदर्शन केले. समारोपप्रसंगी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अरुण भांगरे होते. यावेळी गटशिक्षणाधिकारी अरविंद कुमावत, शिक्षण विस्तार अधिकारी हासे, केंद्रप्रमुख भांगरे, ज्ञानेश्वर लाड, सीमा कानवडे आदी मान्यवर उपस्थित होते. महाविद्यालयाने प्रशिक्षणासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरवल्याबद्दल प्राचार्य भास्कर शेळके, उपप्राचार्य चांगदेव डोंगरे व प्रबंधक सिताराम बगाड यांचा विशेष सन्मान करून आभार मानण्यात आले. जिल्हा प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. राजेश बनकर, अरुण भांगरे, कैलास सदगीर यांच्या समन्वयाने संपूर्ण जिल्ह्यात प्रशिक्षण यशस्वी करण्यात आले. समारोप कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सतीश काळे तर आभार प्रदर्शन गायकवाड यांनी केले. शिक्षकांच्या दर्जेदार प्रशिक्षणाच्या माध्यमातून शैक्षणिक गुणवत्तेत निश्चितच वाढ होईल, असा विश्वास सहभागी शिक्षकांनी व्यक्त केला.

# वीज मंडळ व अहिल्यानगर मनपाच्या बेजबाबदार कारभारामुळे नागरिकांची कुचंबणा- ॲड. शितोळे

**अहमदनगर । प्रतिनिधी**

गेल्या दीड महिन्यापासून वीज मंडळाच्या बेजबाबदार कारभारामुळे अहिल्यानगरकर त्रस्त झालेले आहेत. भर उन्हाळ्यात कोणतीही पूर्वसूचना न देता वीजपुरवठा खंडित केला जात असल्यामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.



उष्णतेमुळे लहान मुले, वृद्ध व आजारी नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः उच्च रक्तदाब व हृदयरोग असणाऱ्या रुग्णांचे हाल होत आहेत, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते ॲड. रवींद्र शितोळे यांनी पत्रकार परिषदेत दिली. आता पावसाळ्याची सुरूवात होताच परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे. शहरात थोडा जरी पाऊस पडला, तरी वीज पुरवठा खंडित होतो. नागरिकांनी तक्रार करण्याचा प्रयत्न केला, तर संबंधित कार्यालयाचे फोन बंद असतात किंवा उचलले जात नाहीत. अनेकदा कार्यालयात प्रत्यक्ष गेल्यास जबाबदार अधिकारी अनुपस्थित असतात किंवा ''मनुष्यबळाची कमतरता'' सांगून टाळाटाळ केली जाते. पावसामुळे विजेचे खांब, ट्रान्सफॉर्मर परिसरात पाणी साचल्यामुळे साप, घुशी, उंदीर यांसारखे सरपटणारे प्राणी बाहेर पडतात. त्यामुळे सर्पदंशाच्या घटनांचा धोका वाढतो. याच दरम्यान शहरातील रस्त्यांचे काम सुरू असताना आधीचे खड्डे तसेच राहिल्याने अपघात होण्याची शक्यता दाट आहे. ॲड. शितोळे यांनी वीज मंडळ आणि महापालिकेच्या हलगर्जीपणावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. वीज मंडळाने सुरळीत आणि नियमित वीज पुरवठा करावा, तसेच महापालिकेने शहरातील खड्डे तातडीने बुजवावेत, अशी मागणी त्यांनी केली आहे. अन्यथा नागरिकांना कायदेशीर व सनदी मार्गांचा अवलंब करावा लागेल, असा इशाराही त्यांनी दिला.

# जिल्हा परिषद प्रभागरचना कार्यक्रम जाहीर

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील जिल्हा परिषद निवडणुका गेल्या तीन वर्षांहून अधिक काळ रखडल्या होत्या. अखेर या निवडणुकांसाठी प्रभाग रचना कार्यक्रम जाहीर करण्यात आला असून, त्यामुळे जिल्हा परिषद निवडणूक प्रक्रियेला गती मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर ग्रामविकास विभागाने या संदर्भात पावले उचलली असून, विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले यांनी प्रभाग रचनेचे आदेश जारी केले आहेत.

**प्रभाग रचना कार्यक्रमाचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे**

| दिनांक | कार्यविवरण |
|---|---|
| १४ जुलै | जिल्हाधिकारी प्रारूप प्रभाग रचनेची अधिसूचना प्रसिद्ध करतील |
| २१ जुलै | प्रारूप अधिसूचनेवर हरकती व सूचना सादर करण्याची अंतिम मुदत |
| २८ जुलै | जिल्हाधिकाऱ्यांनी हरकती व सूचनांचे अभिप्रायासह सादरीकरण विभागीय आयुक्तांकडे करणे. |
| १९ ऑगस्ट | विभागीय आयुक्तांकडून सुनावणी व अंतिम निर्णय. |
| १८ ऑगस्ट | अंतिम प्रभाग रचना राज्य निवडणूक आयोगाकडे किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याकडे सादर करण्याची अंतिम तारीख |

यासह, नगरसह राज्यातील इतर सर्व जिल्ह्यांमध्ये देखील प्रभाग रचना प्रक्रिया सुरू होणार असून, जिल्हा परिषद निवडणुका लवकरच जाहीर होण्याची शक्यता आहे.